# डॉ. नितीन मोरे

# INSTANT कालिदास



# इन्स्टंट कालिदास

## (काव्य नाटिका)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# इन्स्टंट कालिदास

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ

वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान -:

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237 (फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- ६ जानेवारी २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यत:- आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे चव्वेचाळीसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# इन्स्टंट कालिदास

## डॉ. नितीन मोरे

***मराठी फ़ेसबुकवरील***

***समस्त कालिदास, भवभूती, व्यास, वाल्मिकी***

यास सप्रेम

# १

# इन्स्टंट कालिदास!

एक होस्टेलची खोली. दोघे मित्र. त्यातील एक स्कॉलर दिसावा असा. जाड चष्मा वगैरे. दुसरा कवी. दिसण्यात वागण्यात बोलण्यात.. ढगाळ कपडे नि अस्ताव्यस्त केस. स्कॉलर चे नाव क्ष मानले तर कवीचे य मानावे लागेल.. पण नाही.. स्कॉलर भले ही अ ब क असेल पण कवी? तो असा क्ष य वगैरे असेलच कसा? देवाच्या लाडक्या कविराजास नाव तर असावेच लागेल. तेव्हा क्ष वगैरे मानणे सोडून देऊ. स्कॉलर म्हणजे विराज साने आणि कविराज राज माने.. कवितेची नुकतीच मिसरूड फुटलेल्या राज ची कवितेची तलफ भागवता भागवता विराज वैतागलाय. कविराज मात्र स्वत:स शब्दसृष्टीचा राजा समजणाराच नव्हे तर म्हणवणारा ही. तो कधी कधी यमकात अडतो तर कधी शब्दांत. कधी कल्पना सुचत नाहीत तर कधी लिहायला विषय.. तरीही हार मानेल तो कवी कसला? कविराज राज मात्र स्वत:ला कालिदासाचा अवतार मानायला कमी करत नाही.

अर्थात कविकल्पनाच ती! त्यात काहीही होऊ शकते!

थोडक्यात नवकवी ते महाकवी..

या प्रवासावरून विराजशी तो भांडायलाही तयार आहे!

**राज :**

**शब्द सृष्टीचा मी तो ईश्वर**
**एक मी शाश्वत बाकी नश्वर**
**उभारीन मी नव दुनिया असली**
**कसेही असो जग, ती दुनिया सुंदर**

**समजशील मज तू का साधा**
**कविता माझी कृष्णाची राधा**
**बोलशील तू म्हणशील काही**
**कविता प्रसूतीत आणशी बाधा..**

**शब्दच माझे जणू जादूगार ते**
**शब्दांवाचून जग सुने सुने ते**
**जे न देखे रवि ते पाहीन मी**
**काव्यातूनी या दुनिया दिसते**

**काव्यच जीवन काव्यच जगणे**
**छेडित छेडित काव्य तराणे**
**देवाचा लाडका कवी मी**
**महाकवी सम मजला होणे**

**विराज :**
**झालास म्हणतोस आता तू कवी**
**घुसळ भावना फिरवून एक रवी**

**वरवरचे ताक नकोस फेकू**
**प्रतिभेला मिळेल तितका टेकू**

**नाहीतर मस्त काव्यकढी बनव**
**ऐकणाऱ्यास येऊ दे कणव**

**एक बहाद्दर आमचा कवी पठ्ठा**
**घालत फोडणी बनवित मठ्ठा**

**नक्की काढ काव्याचे नवनीत**
**जमलेच यमक तर बनव गीत**

**पिऊ दे काव्यामृत ओरपून त्यांना**
**तृष्णार्त बिचारे ते ज्यांना त्यांना**

**तर श्रोतृवर्ग करेल काय?**
**ऐकेल बिचारा.. डोके खाली वरती पाय!**

**भागव त्यांची साहित्यिक भूक**
**जोवर न म्हणती बस बरे तू मूक ! **

**राज :**
**कळतात बरे कुत्सित बोलणी**
**उगाच देशी अशी फोडणी**

**आम्ही नसता तारांगण गतप्रभ**
**नसता आम्ही झाकोळेल नभ**

**आम्ही म्हणुनि जगत हे सुंदर**
**सैरंध्री सम वाटे बंदर**

**पाजवित आम्ही मधुर मधु**
**आम्हाविण जगत ही ते अधु**

**ऐक बस मज काय ते हवे**
**बनवीन कविता मी ज्या सवे**

**सुंदर कल्पना विषयही सुंदर**
**सौंदर्याची सगळी चादर**

**शब्द शब्द मी जपून वापरीन**
**टिपून गुंफून काव्यात माळीन**

**शब्द सुंदर सुयोग्य मज हवे**
**वापरून बनवीन गीत नवनवे**

**विराज :**

**कुणी शब्द देता का शब्द..**
**आमच्या या कविराजांना हवाय**
**एक शब्द जुळणारा**
**एक शब्द जोडणारा**
**जोडेल जो स्वप्राणाने**
**अर्थांचे डबे**
**एकमेकाला एकमेक**
**वाघिणींसारखे..**
**जाईल मग**
**भरधाव**
**आगगाडी कवितेची..**
**झुकझुक झुकझुक..**
**न थांबेल ती जरी**
**बीचवाले स्टेशन म्हणतील**
**रूक रूक रूक रूक..**

**राज :**

**होय! शब्दांनी**

**बनवेन ती**

**शब्दांची अगिनगाडी**

**भावनांच्या चेतवलेल्या**

**अग्निवर चालणारी..**

**कधी काळाकुट्ट कोळसा**

**इंजिनात घालून**

**पांढऱ्याशुभ्र**

**भावनानंदात कोणाला**

**न्हाऊ घालणारी..**

**कशासाठी पोटासाठी म्हणत**

**घाटावर होईल ताठ**

**घेऊन जाईल**

**आयुष्याच्या प्रवाशांना**

**अनुभव देत**

**कधी मुलायम कधी राठ..**

**मेळवित ऐसी अक्षरे रसिके**
**कवितामृताचे पाजीन**
**थेंब चार**
**काही कडू काही आंबट**
**काही अभिमानी**
**काही लाचार..**

**कविता माझी असेल अशी**
**सजलेली नवी नवरी जशी**
**पण काढू नका निष्कर्ष कुणी**
**उगाच पडाल कधीच फशी!**

**कविता माझी असली उत्कट**
**कुणी म्हणे.. गप**
**नको ती कटकट**
**असल्याने हटेल तो**
**कवी कसला?**
**हाकेल गाडी**
**स्पीड तो दुप्पट..**

**झुकझुक निघेल**

**माझी गाडी**

**अर्थांची ती घेत स्टेशन..**

**अर्थगर्भ अन अर्थपूर्ण ती**

**नसेल अर्थाचे**

**तिथे रेशन..**

**विराज :**

**या शब्दांनो**

**लवकर या**

**धावत पळत**

**असाल तिथून**

**निघून या**

**अडलेल्या बाळंतिणी**

**सारखा**

**अडलाय इथे**

**एक कवी**

**सुचत नाही**

**जुळत नाही**

**हवी त्याला**

**कविता नवी!**

**या शब्दांनो**

**लवकर या**

**असाल तसे**

**निघून या..**

**राज :**

**एक शब्द जोडू**

**बाबा दोन शब्द जोडू**

**दाटल्या उरात भावना अशा**

**कवितांची कोंडी फोडू**

**धडधड धडधड डाऊनलोड**

**घरी बसा न घासा चप्पलजोड**

**गुगलून किंवा डोके घासून**

**कविता चल करू कडू गोड**

**कवितेत माझ्या काय नाही?
सुखदु:खे नि सारे काही
हसाल थोडे नि रडाल खूप
डोळे पुसून होईल ओली बाही**

**हसण्यात म्हणे न कळे जीवनार्थ
गांभीर्य नसेल तर म्हणे सारे व्यर्थ
ठासून भरेन म्हणतो दु:ख सारे
जसे कोणास न ठावे माणूस मर्त्य**

**झारा घेऊन बुंदीचा
किंवा सोऱ्या चकलीचा
पाडू पाडू म्हणतो मी तर
एकेक घाणा कवितेचा**

**या सगळ्यांनो या रे या
लवकर भरभर सारे या**

**श्रवण करा रे श्रवण करा**
**आज दिवस माझा समजा**

**ठेवा तयार सारी गात्रे**
**कवितेत माझ्या असली पात्रे**
**हाती राहू द्यात हात रूमाल**
**मन न भरेल फक्त दर्शन मात्रे**

**आला आला कालिदास इन्स्टंट**
**शब्द शब्द जुळवित कॉन्स्टंट**
**तिनोळी चारोळी सुनीत काव्य**
**महाकाव्य ही नाही डिस्टंट..**

**विराज :**
**हा पहा आला**
**इन्स्टंट कालिदास!**
**अक्षर आणि अब्जावधी**
**शब्दच याचे दास..**

**कविता याची**
**इतकी मोठी**
**ऐकता येईल**
**का प्राणही कंठी?**

**थोडक्यात ..**

**एक आहे चपळ कवी**
**करीन म्हणतो कविता नवी**
**इन्स्टंट मॅगी की चायनीज सूप**
**बोला तुम्हाला कसली हवी?**

**म्हणतो फक्त विषय पुरवा**
**विषय अडवा विषय जिरवा**
**मेंदूत जेव्हा शिरेल विषय**
**खुशाल तेव्हा शब्द अडवा**

कविता म्हणतो करीन छान
कितीही मोठी वा किती लहान
जुळवून जुळवून शब्द सगळे
इन्स्टंट कालिदास बने महान

खाईन म्हणतो कवितेची गोळी
भावभावनांना देऊन हाळी
भरेल अर्थ इतका ठासून
वाटेल मोठ्ठी ही चारोळी

रचित जाईन ओळीमागून ओळ
फिलिंग्जची गादी अन् पद्याची खोळ
होईल तो फेमस इतका
ओळखेल त्या गल्ली अन् बोळ
म्हणे वाचा वाचा ही ताजी ताजी
फास्टफूडसम कविता माझी
इन्स्टंट आणि रूचकर भारी
पिझ्झा न बर्गर, नाही भाजी

खूप खूश व्हा अथवा उदास
शब्दांच्या कोंदणात बसवेल खास
न फाफट पसारा नाही लांबण
तीन ओळी चारोळी अगदीच बास

कविता याची बनते झटपट
यमके जुळती चटचट फटफट
कालिदासाच्या तोंडात बोटे
खंडकाव्याची नकोच कटकट

कविता आहे कुरण चरते
कारण याला कुठलेही पुरते
बनून इन्स्टंट कालिदास
काव्याला येऊ दे भरते..

राज :

हाय!

एक काळ असाही होता लागे

**लांबलचक शब्दांची मुंगीसारखी रांग**
**तेव्हा काय सांगायचे.. पक्षी गायचे**
**अन् कोंबडासुद्धा द्यायचा बांग**

**कविला दुसरे काय हवे सांगा?**
**स्फूर्तीदाता कुणी कुणी कल्पनादाता**
**लिहिल यमके, जुळविल कविता..**
**श्वासांसह उडेल छातीचा भाता**

**बघता असली शब्दरत्ने असंख्य**
**उठेल कवि अन् करेल काय**
**बसेल घेऊन खळ, गोंद चिकट**
**बनवेल कविता.. डोके खाली वर पाय!**

**पण हाय रे दैवा हाय रे कर्मा**
**गेला गेला हाय तो जमाना**
**करावे लागते सारे झटपट**
**गर है तुमको नाम कमाना**

लिहीली असती कविता दीर्घ
भावनार्त गूढगूज गाण्यांच्या गोणी
झालो असतो मी ही महाकवि
कालिदास नाहीतर अजून कोणी

बट नो!
मग काय?
लिहिन बापडा कविता छोटी
जमानाच इन्स्टंट नाही सांगवत
इट्स अ लॉस टू मराठी कविता
लांबलचक वाचून नाही पांगवत..

मुकेल मराठी महाकवीस एका
याचेच मला वाटते वाईट
मी महाकवी तू मित्र माझा
झाली असती ना तुझी कॉलर टाईट?

**विराज :**

**बन की राजा राज कवी तू**
**किंवा इव्हन महाकवी**
**चमक धमक अन यमक जुळवता**
**आकाशीतून बघेल रवी**

**एक युक्ती सांगतो सोपी**
**बस जुळवत छापखान्यात खिळे**
**यमकामागून यमक जुळवता**
**कवी दर्जा तुज का न मिळे?**

**बनव नाहीतर गाजरपुंगी**
**ट्राय कर वाजविणे तुतारी**
**न वाजली तर खावी तोडून**
**छान आयडिया की न दुधारी?**

**राज :**

**काय मित्र हा असा लाभला**
**जिभेला ही का हाड नसे**

**बनेन जेव्हा महाकवी मी**
**उडेल हा तीन ताड असे**

**छापखाने न खिळे वापरती**
**कुणी न वापरती पद्धती जुनी**
**प्रतिभेचे वरदान लाभता**
**बनती कविजन मजसम गुणी**

**कविकल्पना कधी न सुचती**
**कधी विषय न सुचती मधी मधी**
**हां.. अटकतो मध्ये मध्ये मी**
**शब्दच न सुचती कधी कधी**

**विराज :**
**सटवाईने का रेखिली काव्यरेखा तव भाळी**
**वाढविशी फुलविशी शब्दबाग तू समजून माळी**

**जपून जपून ठेवलेले शब्द जुळविशी कारे**
**काव्य कविता पोयेटरी तयांस म्हणविशी मारे**

जुळविण्याचे शब्द कसब तसे तुझे न्यारे
अर्थाअर्थी संबंध असो नसो वाहे ऐसे वारे

शब्द शब्द जोडण्याची ही खोड बरे वाईट
समजून स्वत:स कविराज करिशी कॉलर टाईट

कमलदलातील भुंग्यापरी अडकलास शब्दांत
एकदा का झाले ऐसे समज मग तो तुझाच अंत

दुनियादारी बिलेबिले भरण्या उपयोग न येती
शब्द समज माणिकमोती खऱ्या दुनियेत माती

पाड सख्या तोंडातील तुझ्या कवितेचा दात
येतील शब्द ओठी त्यांस ढकल स्व घशात

बोलवून मांत्रिकास उतरव कवितेचे भूत
डोक्यावर हात मारी तसा मेंदू दाता देवदूत!

जवळचा एक पेपर हाती घेत वाचतो..

**वा!**

**खूशखबर खूशखबर खूशखबर**
**पहा पहा ही जाहिरात पहा**
**नवीन उघडे ही वर्ड बँक अन**
**मिळतील तिथे ते शब्द अहा!**

**अडले यमक तर जुळवा शब्द**
**विकत मिळे वा मिळे लोनवर**
**आणिक प्रागतिक डिजिटल ही तर**
**घरबसल्या इव्हन पुरविती फोनवर**

**जास्त नव्हे थोडाच खर्च तो**
**वेळ आणिक दीड दमडी**
**कवितेला अर्थाचा वर्ख तो**
**त्यासाठी दमडी जाये की चमडी..**

अक्षर शब्द वाक्प्रचार म्हणी
म्हणे उपलब्ध ऑन डिमांड
कुणी ही बना लेखक कवि
लँग्वेजवर असो नसो कमांड

आहे किती ही गुड न्यूज
करून घे तुझे स्वप्न साकार
वापरून ते शब्द कुठकठे
दे काव्याला तू आकार

राज :
अहा हा हा तर अलभ्य लाभ
शब्द मिळतील इथे भारंभार
कुणी एक्स्ट्रा चार्ज घेऊन देईल
कल्पना ही का कुणी उधार?

बघ मग कवि बनणे किती होईल सोपे
उगाच इकडे तिकडे नको पाहाणे

**सुचत नाही कसे काही मजला**
**नको उगाच सांगणे बहाणे**

**डिजिटल युगात का न कवि डिजिटल**
**का न मिळावे इन्स्टंट कुणी**
**खचितच बनेन मी कालिदास इन्स्टंट**
**म्हणतील समीक्षक हा कवि गुणी!**

# २. मुलाखत..!

**इन्स्टंट झाला नि कालिदास झाला तरी त्याचे जगण्याचे प्रश्न थोडीच आपोआप सुटणारेत? जगण्यासाठी चंद्र आणि तारे तोडून द्यायची गोष्ट केली तर त्याला अकलेचे तारे तोडू नकोस असला जबाब मिळायचा! काव्यवेडा राज तरीही सगळ्यात काव्य शोधत फिरतोय.. कुणी शब्द देता का शब्द म्हणता म्हणता कोणी नोकरी देता का नोकरी पर्यंत पोहोचलाय..**

**राज कविच्याच वेशात, हातात कागदाची भेंडोळी आणि खांद्यावर झोळी घेऊन निघालाय..**

**राज :**

**हाय! पहा ती किती ती निष्ठुर दुनिया**
**कवीस धाडे पोटापाण्या, नाही तिजला दया**

**कवि का जन्मे असल्या कामासाठी?**
**हाती पेन, कराया का लेखनकामाठी?**

**हिशेब ठेवण्या का जन्म कविचा असे?**
**आवज जावक लिहित बसण्यासाठी कसे?**

**पण जातो झालो आज मुलाखतीस मी**
**नोकरी शोधेन मी या कविस काय कमी?**

**मिळेल का त्यांना कोणी कवि कम अकाउंटंट**
**झक्कत करावे लागेल त्यांना माझ्यावर काउंट**

**मिळेल ती, नोकरीचा तो न प्रश्नच मजला**
**लिहिता लिहिता हिशेब लिहिन मी ही गझला**

**पण हाय! का कविने दवडावा वाया वेळ?**
**काव्य रचता, आकडे मांडता, कसा बसावा मेळ?**

**विराज :**
**निघाले पहा ते कविराज**
**जगावर शब्दांनी करणारे राज**

**त्यांचा हाय अलगच हा बाज**
**आपल्या शब्दांचाच त्यांना माज..**

**हातामध्ये लांब डिग्रीची भेंडोळी घेऊन**
**निघतील कविराज असूनही डोईवर ऊन**

**शब्द शब्द जपून ठेविला कविने कवितेतून**
**डोईवर चंद्र अन चांदणे वाटे तळपते जणू ते ऊन**

**म्हणेल कविराज मजहून नसे कुणी दुसरा**
**पण हाय! तिथे का बसला कोणी त्याचा ससुरा?**

**राज तयारीत निघतो. एका ऑफिसात. मुलाखत सुरू आहे..**

**ऑफिसातील कर्मचारी :**
**वा! छान! छान! फर्स्ट अटेंप्टात झालात पास**
**पण का बरे ते मार्क न दिसती काही खास?**

**बरे, आहे का अनुभव काही तुमच्या गाठीशी?**
**साहेब आमुचे तसे चांगले, घालतील पाठीशी**
**पण त्यांस हवा कुणी चांगला हुशार कँडिडेट**
**अकाउंट्स अन टॅली वगैरे सारा अपटुडेट**

**किती येतसे तुम्हास सांगा कॉम्प्युटर प्रोग्राम**
**बुक किपिंग करता ना की त्याच्याशी संग्राम?**

**राज :**
**बुक कीपिंगमध्ये माझा हातखंडा असे**
**ठेवतो सारी पुस्तके कवितांची आवरून नीटसे**

**हिशेब करतो मी शब्दांचा लावूनी जीव असा**
**शब्द शब्द ठेवितो जपून मी, हिशेबी मी तसा**

**काना मात्रा वृत्त नि छंदात असे चोख एकदम**
**शिस्तीत वागती सर्व शब्द न चुकता एक कदम**

**नका विचारू तंद्रीत ही मी करतो इतके काम**
**बसतो जुळवत यमकाची जोडी,कवितांतूनी तमाम**

**वाटत नाही माझ्याविन असे कुणी कँडिडेट**
**वृत्ते छंद यमके वगैरे, हवे तितके ते अपडेट**

**ही भेंडोळी कागदांची आणली फॉर्मॅलिटी जस्ट**
**म्हटले दाखवू तुम्हाला, म्हणाल तुम्ही ते मस्ट**

**या काव्यसृष्टीचा हिशेब मात्र सारा न्यारा असे**
**ह्या शब्दसृष्टीचा शब्द न शब्द मजला प्यारा असे**

**द्या मजला नोकरी, घ्या कामावर सत्वर**
**कविता करण्यामध्ये मी अट्टल, सदा कार्यतत्पर**

**बदलून टाकीन ऑफिसचे मी रूपडे सारे**
**कशाच पै पै साठवित बसावे, ते रूपडे मारे?**

**साठवित बसा इथे शब्दांचीच रत्ने**
**ज्यासाठी मी जीव लावूनी करीन यत्ने**

**पावला देव मज, मी लाडका त्या देवाचा असे**
**घ्या मज झडकरी कामावरती, कासवा हरविती ससे!**

**कर्मचारी :**
**हवा आम्हाला कुणी वर्कर हुशार अन अनुभवी**
**क्वालिफिकेशन खतरनाक, दिसते ही डिग्री नवी**

**तरीही..**
**छान! छान! या तुम्ही.. दिसता फारच होतकरू**
**साहेबांना विचारून आम्ही तुम्हास फोन करू**

**राज निघून जातो..**
**त्याच्याकडे पाहात**

**कर्मचारी :**

**असा ही असतो का उमेदवार कोणी जरत्कारू?**
**कविता करतो म्हणतो हा तर.. याचे काय करू?**

**साहेबांकडे असता मी जर पाठवला याला**
**माझ्याही नोकरीवर असता त्यांनी घातला घाला**

**दुनिया बाबा ही पैशाची इकडून तिकडे असे**
**खरे नाही बाबा काही, तुज कवितेचे लागे पिसे**

**राज बाहेर जाता जाता रस्त्याने चालतोय.. अर्थातच स्वत:वर खुश आहे..**

**राज :**

**छान! छान! म्हणाला तो इंटर्व्ह्यूवाला**
**मिळेल नक्की हीच नोकरी, जीव हलका झाला**

**ही अति सुंदर सर्वप्रथम प्रियेला देईन मी बातमी**
**म्हणेल ती अतिखुश होऊन अता आपणा काय कमी**

**किती हुशार मी, कशी दिली मी प्रश्नांची उत्तरे**
**झकत देईल तो मला नोकरी.. दुसरे काय करे?**

**मिळेल नोकरी करत चाकरी कमवीन काहीतरी**
**कटकट म्हणजे मिटेल सारी म्हणजे तिच्याही घरी**

**एका बागेत येऊन थांबतो. प्रियेची वाट पाहात..**

**राज :**
**नाहीस आलीस अजून तू पाहू किती वाट**
**शहर हे तर मोठे, नाही येथे नदीचा घाट**

**म्हटली असती नदीच्या काठी प्रेमाची गाणी**
**विसरून सारे जग अन तगादा लावणारा वाणी**

**वाटले सांगीन मी गुडन्यूज आणि गोड करेन तोंड**
**पण नाही हिचा पत्ता अजूनी उभा मी हलवीत सोंड**

**काय म्हणता? सोंड? याला अर्थ काहीच नाही?**
**वर्ड बँकेच्यामध्ये पण मिळता शब्दच दुसरा नाही!**

**प्रिया धावतपळत घड्याळ पाहात पोहोचते..**

**आलीस प्रिय प्रिये प्रिया तू मी होतो पाहात वाट**
**छान बातमी देईन म्हणतो.. बघ भरले आपले ताट**

**प्रिया :**
**नाही ना राजा जानू माझ्या मी उशीरा आले?**
**निघता अडकले कुठे.. तुज भेटण्या अधीर झाले**

**तुझी प्रेमाची बातमी ऐकण्या आतुर मी रे किती**
**घरी नाव निषिद्ध तुझे ते, उगा ते किती रेकिती**

**तू मेरा दिलवर है.. तूच रे मेरा हीरो**
**पण हाय! या शब्दकवीला समजती घरी झीरो!**

**सजणा राया जानू जानम तू माझा बीएफ**
**तव नावाचा जप करते अन तुझाच रे मजला कैफ**

**राज :**

**आज मी तर खूप खूश सजणे, मिळेल मज नोकरी**
**डोक्यावरती घेऊन फिरेन मी कवितांची टोकरी!**

**छंदबद्ध महाग थोडे, वृतात बसणारे महाग अति**
**मुक्त छंद पण उपलब्ध फ्रीली, बघा बजेट मध्ये बसति!**

**करीन कविता गझला गीते वेळ मज नसे पुरला..**
**थोडेफार काम हिशेबाचे, करेन वेळ जर उरला!**

**करून टाकू प्रिये चल जग कवितामय सारे**
**वाहवू चल इकडे न्यारे, खारे अन मतलई वारे..**

दोघे हातात हात घालून निघतात..

# ३. मुलाखतीनंतरचे कवित्व!

**होस्टेलची रूम. तिघे, म्हणजे राज, विराज आणि प्रिया आहेत.**

**विराज :**

**मग काय म्हणता कविराज?**
**प्रियेच्या दिलावर करता राज..**

**इंटर्व्ह्यूत लाविले शंभर व्होल्टचे दिवे**
**पहा मग स्वप्ने आता प्रियेच्या सवे..**

**हा बनला कसा मोठा हिशेबनीस**
**पाडेल शब्दांसम पयशांचाही कीस?**

**काय बाबा एका माणसाचा रूबाब..**
**मी जावे का येथून? मी हड्डी इन कबाब?**

**राज :**

**लवकर फारच कळले तुजला राजा**
**बारात येईल तर वाजवशी तू बाजा**

**की वाजविशील तुतारी म्हणून पिपाणी**
**गाशील अन गाणी आर्त विराणी?**

**तू तसा कबाब मधले हाड..**
**तू म्हणजे मोठ्ठाले अभ्यासाचे बाड**

**तू म्हणजे जसा फिश फ्रायतील काटा**
**तू म्हणजे पिकल्या हापुसातील बाठा**

**मी म्हणेन या विराजास रस्त्यामधेच गाठा**
**आणिक कुणीतरी काढा रे याचा काटा..**

**प्रिया :**

**अय्या!**
**किती प्रासादिक अन रसाळ रे तुझी वाणी**
**ऐकून असेच ते शब्द मी झाले तुझी दिवाणी**

**वाटते ऐकत बसेन तुझ्या कविता रसाळ मधाळ**
**हे जीवन होईल गोड किती जणू मधाचे पोळ**

**असल्या शाब्दिक जादूवरतीच मी भाळले अशी**
**वाटते ऐकत राहीन जीवनभर घेऊन गादी अन उशी**

**विराजभाऊ आहे ना माझा हा सजणा सुंदर**
**आता तर नुसताच न कवि, नोकरीवाला बंदर..**

**अहो बंदर म्हटले म्हणून नका हो असे दचकू**
**यानेच दिलेला उधार शब्द, म्हटले वापरूनच मी पचकू!**

याच्याकडे म्हणे आहे एक शब्द बँकेचे खाते
असलेच पाहिजे.. काळानुरूप नष्ट जाहले जाते

सोय होती पूर्वी चांगली, जात्यावर सुचे ओवी
शब्दाने वाढे शब्द, कुणी ते गाण्यामध्ये गोवी

आता आला मिक्सर बिक्सर, ते जातेही गेले
शब्दांचा राजा राज आणतो शब्द भरूनी पेले

मी किती नशीबवान माझा बीएफ शब्दसखा
तो विणतो गाणी, कातीत जणू सूत घेउन चरखा

या चरख्यावरती मी तर इतकी भुलले
होती कळी मी आता फूल होऊनी फुलले..
( पाठी राज आणि प्रिया एकमेकांशी बोलत आहेत..)

विराज : (हळूच..)
वेडात बुडाले आकंठ प्रेमात प्रेमवीर
सटकावे आता येथून गाठावा दुसरा तीर

**या कवितांच्या गावातील प्रेमिकांत काय ते काम**
**बोलता मध्ये मध्ये करतील कामच माझे तमाम**

**पण होईल काय, हा घरी प्रियेच्या जाईल**
**करतील स्वागत की हा चप्पल मार खाईल?**

**मोठ्या घरची प्रिया, हा कवि साधा अकांउंटंट**
**ते देतील घुसाया त्यांच्या तंबूत बनूनी उंट?**

**बघावेच होते काय हा जाईल तिच्या बंगली**
**कालिदासा शकुंतला मिळेल का चांगली?**

**इन्स्टंट हा कालिदास पाठवेल का मेघदूता**
**द्या हात हाती माझ्या.. आवडे तुमची मज सुता..**

**देतील हात हातात का,ही हभप पांगारकरांची नात**
**राज पाहतो स्वप्ने मोठी जमेल का त्याची बात?**

**जवळच घोडामैदान, दिल्ली नसे ती दूर**
**बघूयाच जाउनि घरी त्यांच्या, बघू कसा तो नूर..**

## ४. प्रिया का घर!

**स्थळ :**

प्रियाचे घर. ती उभी आहे. समोर तिचे वडील श्री. गिरधर पांगारकर. पाठमोरे. समोर एक तसबिर, त्यात कीर्तनकार ह.भ.प. लक्ष्मणराव पांगारकारांचा कीर्तनकाराच्या वेशातील फोटो.

**प्रिया :**

**सांगायाचे काही मजला**
**अप्पा मी तर मोठी झाले**
**आवडला मजला कोणी**
**नावच त्याचे ओठी आले**

**आवडला या राणीला**
**तो रविकर तो गोजिरवाणा..**
**अप्पा तुम्ही म्हणू नका नाही**
**नाही काही तो दीनवाणा**

एक असे लाखांतून तो
खरेतर एक कोटींतून
शोधून काढा सात समुद्र
हवेतर कुठल्या बोटीतून..

तयाचे काय ते दिसणे
तयाचे काय ते हसणे
तयाचे काय ते चालणे
तयाचे काय ते बोलणे..

ह्या हृदयीचा
चुकतो ठोका
मी धावते मागे.. जणू
लोण्यामागे बोका..

किंवा किड्यामागे बेडूक
तशी मी नाही किडूक मिडूक..

**बेडका मागे धावे सरडा**
**नाही तीन दिवसाचा तेरडा**

**प्रेम आमचे जन्मांतरीचे**
**दिव्य प्रेम ते शतकांतरीचे..**

**जणू त्या चंद्राची मी चांदणी**
**जणू गोंदाची मी गोंदणी..**

**वडील :**
**बस!**
**घराणे काय आपले । घरी वातावरण तापले**
**विवाहवय येऊन ठेपले । जवळीच ।।**

**त्यात कुणी आवडे तुला । ठावठिकाणा न त्या मुला**
**जपले तुजवर जणू फुला । तो बिनकामी**

जावई असावा तोलाचा । आणिक तसाच मोलाचा
नसावा असा बिनकामाचा । कदापिही ।।

असेल कुणी तालेवार । सापडेल शोधता सभोवार
आनंदा ना पारावार । राहिल मग ।।

असा विचार सर्वांचा । नव्हे फक्त या बापाचा
आशीर्वाद ह्या आजोबांचा । असेल खचित ।।

मुळीच न करावे सहन । विचार होईल गहन
विचार करावा वहन । जामाताविषयी ।।

त्यात म्हणे तो असा । बेरोजगार ही कसा
जिंकेल शर्यतीत का ससा । कधीतरी ।।

सोडावा त्याचा विचार । खरेतर तो अविचार
एक सोडून मिळतील चार । मुले तुज ।।

**तरीही तुझा तो हट्ट । तू राहिलीस चिकटून घट्ट**
**म्हणून देऊन वेळ वट्ट । भेटेन त्यास ।।**

**मिळेल त्यास नोकरी । तर करू विचार खरोखरी**
**पर्मनंट असल्यास बरी । सरकारी ।।**

**प्रिया :**
**तो तर किती हुशार । आणिक किती लडिवाळ**
**तसा आहे थोडा खट्याळ । परि वाटे रम्य ।।**

**आहे तो शब्दपती । किती त्याची न असे गणती**
**तो वात मी त्याची पणती । बनणार ।।**

**असे त्याची बँक एक । त्यात त्याचे खाते एक**
**तिकडून मिळती अनेक । शब्द त्यास ।।**

**नुसता शब्द टाकावा । बँकेतून शब्द उचलावा**
**एकमेका लावावा । लीलया ।।**

**असा तो वर्डबँकेत । आहे मोठा प्रशस्त**
**न बनावे नेमस्त । उगा कुणी ।।**

**वडील :**

**कुळ आपले प्रतिष्ठित । समजावे ते तारांकित**
**त्यात हा कोण नेमस्त । घुसू पाहे ।।**

**पूर्वजांचा काय तो रूबाब । हराभरा तो कबाब**
**काय देईन जबाब । स्वर्गस्थांस ।।**

**नाना मोठे कीर्तनकार । आजोबा ज्योतिषकार**
**त्यात हा छचोर । जावई कैसा ?**

**कोण कुठली ती बँक । असेलही सीपी टँक**
**त्यात याचा कुठला रँक । नसे ठाऊक ।।**

**उंच वाढेल एरंड । तरीही न होई इक्षुदंड**
**न करावे उगा बंड । घराविरोधी ।।**

**तरीही पाहतो तयास । इतका का असे खास**
**नसल्यास प्रेमकथा बास । करीन दी एंड ।।**

**प्रिया :**
**नका म्हणू बास । आहेच तो खास**
**भेटण्याची आस । आहे मनी ।।**

**तो शब्द जादूगार । त्याच्या गुणांस न पार**
**नका देऊ मार । त्यास शब्दांचा ।।**

**त्यात माझा जिवलग । तो येण्याची लगबग**
**त्याचा न यावा उबग । उगा तुम्हा ।।**

**त्यात म्हणे कालच त्याला । जॉब नवीन मिळाला**
**जागा नाही आक्षेपाला । आता काही ।।**

**तो येतच असेल । भेटण्यास जमेल**

**वाटे दुनिया सजेल । स्वागतास ।।**

**राज आत येतो.. प्रियाचे वडील त्याला वळून पाहतात. राज आणि ते, दोघेही दचकतात. आधीचा इंटर्व्ह्यू घेणारा कर्मचारी तोच .. प्रियाचे वडील.. आणि समोर अचानक आलेला तो राज.. प्रियाचा प्रियकर!**

**वडील :**

**हा? रविकर का लाजिरवाणा**

**आवडला आमुच्या राणीला?**

**मुलाखतीत बोलत होता..**

**काय म्हणावे या कविला?**

**अन कोण म्हणाले यास**

**दिली नोकरी आम्ही?**

**कोणास वाटे काय**

**उमेदवारांची आहे कमी?**

**हा म्हणे मोजतो अक्षर शब्द**
**हिशेब ठेवेल हा शब्दांचा**
**पै पैशाच्या चक्रव्यूहात**
**असला कवि का कामाचा?**

**राज गप्प उभा आहे. समोर प्रियाच्या वडलांना पाहून बोलती बंद. शब्द सुचत नसल्यासारखा..**
**मागे वळून निघून जाणार तोच प्रिया म्हणते..**

**प्रिया :**
**लोगों न मारो इसे**
**यही तो मेरा दिलदार है**
**शब्दोंकी करे जादू ये**
**यही तो सच्चा कलाकार है..**

**नकोच अप्पा**
**ते कठोर वागणे**

**नकोच ते**
**उणेदुणे काढणे**

**आज नसेल तर**
**उद्या मिळेल**
**जॉब त्याकडे**
**चालत येईल..**

**अधिक नाही**
**मी बोलत आता**
**राजच बनेल**
**माझा नाथा..**

**वडील :**
**या कविला**
**देईल कोण बरे नोकरी?**
**जुळवीत बसतो शब्द निरर्थक**
**करेल कशी हा चाकरी?**

तरीही देतो चान्स मी एक
संधी शेवटची म्हणा
महिन्यात एका मिळेल नोकरी
तर विचार करीन मी पुन्हा..

प्रिया :
का इतके कठोर
असे कसे अप्पा
इतके सोपे जणू
मारणे गप्पा..

सगळीकडे असे
बोकाळे बेरोजगारी
बिच्चारा हा राज
का फिरे दारोदारी?

करावा विचार
अन फेरविचार

**द्यावे महिने तरी**
**सहा किंवा चार..**

**वडील :**

**आजोबा तुझेच । अगदी कडक**
**नियम प्रत्येक । पाळावाचि ।।**

**त्यांचाच मी पुत्र । कडक शिस्त**
**त्यावरीच भिस्त । असे माझी ।।**

**हप्ते चार म्हणजे । अगदी लिमिट**
**व्हावे जरा धीट । नोकरीस ।।**

**करावा परंतु । यत्न पुन्हा एक**
**नोकरी प्रत्येक । मिळवावी ।।**

**यावे मगच दारी । मागण्यास हात**
**नाहीतर दात । न दाखवावे ।।**

# ५. आता काय करावं बरं?

होस्टेल रूम. विराज, राज आणि प्रिया बोलत बसले आहेत.

**विराज :**

**काय कसे काय**

**असे जाहले काय?**

**गेली नोकरी कशी**

**कशात काय.. फाटकात पाय..**

**कर डोके खाली**

**न वरती पाय..**

**हो बैल जरासा**

**नकोस शामळू गाय**

**नाहीतर बन तू रेडा**

**कविसारखा न बनता वेडा**

**उघड डोळे अन बघ नीट**

सोड कविता बन जरा धीट
मग बघ सगळे पाठी येतील
नजर लागेल, लागेल तीट

पहिली तर ती नोकरी
जर हवी असेल ही छोकरी
टाक डोक्यावरून झटकून
ती शब्दांची काव्य टोकरी!

राज :
काय मित्रा असे बोलणे?
कवितेवाचून काय ते जगणे?

मी दास असे शब्दांचा
अक्षर काव्य अन कवितांचा

देवाचा मी असे लाडका
आज दिसत असे मी कडका

पण नाही हरकत काही
बनून पोऱ्या मारेन फडका

काही करूनी मिळवेन नोकरी
सांभाळत कवितांची टोकरी
ही प्रिया भाळली काव्यावरती
हवी मला ती हळूवार छोकरी

प्रिया : (लाजत)
खरेच मी तर तुझी प्रिया
प्रियतम माझा तूच खरा
बाबा काका मामा म्हणती
हा कविराज नाही बरा..

पण मी ह्यास वरले मनोमन
ह्यांना समजत नाही कसे?
कुणी नोकरी धंदेवाला
ह्यांच्या का सदा मनी वसे?

**नाही मी जगणार तुझ्याविण**
**तू हवास आणि शब्द तुझे**
**वाजव त्या कवितेचा पावा**
**अक्षर अक्षर मनी गुजे**

**विराज :**
**आली परत प्रेमवीरांची गाडी**
**गुलुगुलू गोड शब्दरूळावर**
**गोड गोड अति गोड शब्द**
**जणू मुंगळे चिकटती गुळावर**

**बाबानो! अन बाबीनों**
**या जरा तुम्ही भानावर**
**बनवा प्लॅन कशी मिळे नोकरी**
**लवकर या तुम्ही ताळ्यावर**

**तेच तेच उगाळू नका**

**शब्दाक्षर नि युगुली प्रेम**
**असेल काही जगावेगळे**
**पण सर्वांचे म्हणे असते सेम**

**पण डेव्हिल इज इन डिटेल्स**
**इतके तरी तुम्ही समजून रहा**
**उघडा डोळे बघा नीट**
**अवतीभवती जरा पहा..**

**थोडी रात्र नि सोंगे फार**
**मिळेल इतक्या अवधीत कुठे**
**छोकरीची सोय जाहली**
**नोकरी न मिळे तो आडमुठे**

**उठा मुलांनो उठा**
**करा ध्येयाकडे वाटचाल..**
**नाही आता जागलात तर**
**डॉग वोण्ट इट तुमचे हाल..**

**राज :**

**ठाऊक मजला या दुनियेला**
**नसे तमा कोणाची**
**म्हणूनी व्यवहाराने का**
**पिरगाळावी मुंडी कविची?**

**आकाशीचे मोजत**
**असतो मी चंद्र न तारे**
**मोजा म्हणती नोटा नाणी**
**या कविला का वा रे?**

**देवाने धाडिले या धरतीवर**
**ठेऊन मनी काही हेतू**
**आम्ही कविगण म्हणजे**
**निष्ठुर दुनियेमधील सेतू..**

**विराज :**

**तेच ते अन तेच ते**

**उगाळशील किती?**

**अरे, राहशील बेकार**

**वाटत नाही तुला भीती?**

**हलवा आता हात न पाय**

**नाहीतर पुढच्या जन्मी गोगलगाय..**

**आता घाला पोटात पाय**

**नका ऐकू, मला काय?**

चाल बदलत

**हे कविमनाच्या**

**तरूण बालका,**

**काळाच्या ऐक हाका**

**उघडून कानाच्या पाळ्या**

**आला प्रसंग बाका..**

**ठेव बाजूला प्रसंगी**
**जुळणाऱ्या शब्दांच्या ओळी**
**विसर हवेतर कसा**
**कशी बांधावी शब्दांची मोळी**

**ठेव बाजूस आपला हट्ट**
**घट्ट कर मन अन्**
**नाणे वाजवून घे**
**आपले वट्ट..**

**ध्येय एकच तुझे हवे**
**नकोच आता शब्द नवे..**

**करावी कुणाची अशी चाकरी**
**भाकरी करता लागते रे नोकरी..**

**नवीन आता सुरू मिशन ..**
**मिळाली नोकरी तर..**
**प्रिया वहिनी..**
**काय कमिशन?**

**(प्रिया लाजते..)**

**प्रिया :**

**तू विराज**

**अतिचावट**

**वात्रट..**

**भित्रट**

**पस्त्रट..**

**खारट**

**खरेतर खट..!**

**मिशन नोकरी होईल सुरू**

**त्यात तू असशी ह्याचा गुरू..**

**कमिशन कसले हवे तुला रे?**

**नोकरी मिळता एक**

**कविता करू डेडिकेट तुला रे..!**

विराज डोक्याला हात मारून घेतो..

# ६. शोध नोकरीचा!

**राज :**

**मग काय सांगावे महाराज**
**मागे लागला माझ्या विराज**
**म्हणे, कर तू प्रियेच्या दिलावर राज**
**पण आधी कर काही कामकाज**

**मग काय?**
**मर्द मराठा उठला पेटून**
**प्रियेस अपल्या बसला खेटून**

**अर्जामागूनी खरडे अर्ज**
**त्यासाठी घेऊन कर्ज**

**पाठवतो ते जिकडे तिकडे**
**कुण्या देवाला घाली साकडे**
**म्हणे कसेतरी जमव आकडे**
**पहातरी जरा प्रियाकडे**

**कसली कसली शोधे नोकरी**
**कुणीतरी तर द्या हो नोकरी**

**ह्या हातांना हवेच काम**
**तेव्हा कुठे मिळे छदाम**

**छदामावाचून नाही मान**
**आधी छदाम मग कविता गान**

**हवी हवी मज प्रिया ती**
**त्यासाठी सारी यातायात ती**

**तसा मी आहे डिग्रीधारक**
**काम द्या कोणी तेच तारक**

**जेव्हा मिळेल कुठला जॉब**
**फिरवत सासुरवाडीच्या घरचा नॉब**

**हात प्रियेचा घेईन मागून**
**कवितेला टेम्परी त्यागून**

**येईल जेव्हा हाती प्रिया ती**
**मग काव्याला येईल भरती**

**असा करून मी तर कावा**
**प्रेमाचा वाजवीन पावा**

**पण त्या आधी हवे काम**
**त्यातूनच मिळेल मग इनाम**

**आधी हाती हवे काम..**
**मगच मिळेल काही इनाम**

**आधी हवे हाती काम..**
**मग मिळेलच काही इनाम..**

**होईन मी मग**
**इमानदार..**
**की इनामदार?**
**असो कोणीही**
**कुणीतरी मोठ्ठा**
**कुणी प्रतिष्ठित**
**मग न बसावे**
**लागेल तिष्ठत..**

**पांगारकरांचा उतरेल पारा**
**घराण्याचा का मिरवावा तोरा?**

**सध्या फेकतो नुसतेच अर्ज**
**वो तर अपना कागजी कर्ज**
**करून ठेवावा नुसताच दर्ज**
**नहीं तो**
**पीछे पडेगा प्यार का मर्ज!**

# ७. ओम भवति नोकरी देई..

पाठून काव्यनिवेदन सुरू .. ते असतानाच..

राज एका ऑफिसकडून दुसरीकडे.. तिकडून तिसरीकडे.. मग अजून एका ऑफिसात भटकतोय.. हळू हळू त्याचा अवतार सुधारतोय.. म्हणजे ढगळ कपड्यांतून व्यवस्थित कुर्ता पायजमा.. मग शर्ट पँट.. आधी बाहेर असलेला शर्ट.. मग तो इनशर्टात.. मग त्यात टाय .. बूट.. एकेका इंटर्व्ह्यू बरोबर तो पुढची पायरी गाठतोय.. एका टप्प्यापर्यंत.. मग फोनवर बोलतोय.. उद्विगनतेने .. मग परत फिरतोय.. हळूहळू परत कपडे बदलत बदलत .. यावेळी उलट्या क्रमाने.. पाठून काव्यनिवेदन सुरू असतानाच शेवटी तो परत आपल्या कविच्या अजागळ अवतारात .. तोच ढगळ कुर्ता पायजमा.. झोळी..

**पाठून आवाज :**
**चला मुरारी हीरो बनने..**
**नव्हे**
**चला मुरारी नौकरी करने..**
**करने नहीं**
**चला मुरारी नौकरी ढूंढने**

**कारण..**

**नोकरी इज लिंक्ड टू छोकरी..**

**जोवर न नोकरी**

**तोवर न भाकरी**

**नि तोवर न मानेल**

**बाप ऑफ द छोकरी..**

**म्हणून बिचारा फिरतोय**

**घेऊन अर्जांची टोकरी..**

**कितीक पडली पेने धारातीर्थी**

**कागद संपले किती ..**

**संपू देत झाले सारे कितीही**

**मन्मना.. नाही क्षती..**

**नव्हे मन्मना नाही क्षिती..**

**पायतळी तुडवे रस्ता**

**हीरोच्या आपल्या चपला..**

**तळवे गेले घासून इतके**

दमला हीरो आपला..

कुरियर वाला.. ट्रॅव्हल वाला
कुणी दुकानदार
कुणी चिटकवता का नोकरीवर
बनतो मी वेठबिगार..

काम करीन म्हणे
गाळीन घाम
द्या कुणी नोकरी
अन द्या दाम..

पण तरीही न
बदले राज
मुलाखतीतुनी ना
बदले जबाब

मग व्हायचे काय?

**नाकात दोन पाय!**
**कुत्र्याचे शेपूट वाकडे**
**कधी सरळ होईल काय?**

**जॉब म्हणे मज हवे**
**पण इंटर्व्ह्यूतून तेच दिवे**

**मग काय?**

**इकडून तिकडे**
**नन्नाचा पाढा**
**ऐकून निराश जणू**
**पिई कडू काढा ..**

**प्रिया ती त्याची**
**हताश बसली**
**चिंता त्याला**
**त्याची असली..**

**काय करावे कसे करावे**
**काही सुचतच नाही**
**कुठून मिळेल अशी नोकरी**
**वेळही बाकी नाही..**

**पाहून समस्यांची रास**
**इन्स्टंट कालिदास**
**असा हताश**
**इतका उदास**

**संपत आले दिवस दिलेले**
**जवळ आली डेडलाइन**
**सुटे धीर अन म्हणे जाऊ दे**
**विसर मला प्रिये,**
**जीवनभर रडगाणे गाईन..**

# ८. व्हॉट्टूडू?

होस्टेलची रूम

विराज राज आणि प्रिया खलबतं करावीत तसे बोलत बसले आहेत..

**विराज :**

**यावे यावे कविराज**
**या खुर्चीवर व्हावे मानविराज..**

**ऐकून आहोत काही बाही**
**नोकरीचा म्हणे पत्त्या न्हाई..**
**खूप झिजवली लेखणी**
**संपवली म्हणे भरपूर शाई..**

**इकडे तिकडे केली चाचपणी**
**केलीत ना सगळी तपासणी**
**सगळे कसे बुवा शांत शांत**
**घुमेल आवाज जर पडेल टाचणी..**

**नवीन काहीतरी करून जा**
**दिवे काहीतरी लावून जा..**
**कशी बघते बघ ही छोकरी**
**नोकरीसाठी टाचा झिजवत जा..**

**राज :**
**नकोस देऊ डागण्या दु:खावर**
**आता तरी ती टीका आवर**
**बघ जरा या प्रियेकडे**
**हेल्प मी आऊट टू प्रियेस सावर..**

**किती टाकले ॲप्लिकेशन्स**
**नाही त्यांची कशी गणती**
**अंधार दाटून आला चहूकडे**
**दिसत नाही एकही पणती**

**उरले फक्त दिवस थोडे**

त्यानंतर का वरातीमागून घोडे?

कुणी देतंय का नोकरी
या काव्यवेड्यास कुणी नोकरी देतं का?
कशीही चालेल कुठेही चालेल
शब्दांशी संबंधित चालेल..
कशीही चालेल..
संबद्धही चालेल..
असंबद्धही चालेल.
या काव्यतुफानाला हवीय एक
चार दिडक्या देणारी नोकरी..
अजून कुठे नि किती करू प्रयत्न?
प्रयत्ने हाती येते सुद्धा म्हणे रत्न..

वाळूचे कण रगडिता गळते म्हणे तेल
पण गाळून तेल त्या वाळूचे करू काय?
न दवडावा वेळ न रगडावी वाळू
उगाच काहीतरी म्हणून करू काय उपाय?

**प्रयत्नांती परमेश्वर अन पंगू ओलांडती गिरी**
**पण कुठल्या प्रयत्नांती मिळेल हो नोकरी?**

**प्रिया :**
**नकोस होऊस असा तू मायूस**
**नकोस असा कोमेजून जाऊस**
**आठवते का तुला ते राजा**
**पैसा पैसा दिला तू खाऊस..**

**छे! तुझी ती वर्ड बँक..**
**पुरवते कसेही शब्द न अक्षर**
**वाटे तिला का ही प्रिया**
**आहे कुणी अनपढ निरक्षर?**

**पण जाऊ देत ते नको विचार**
**काय करावे समजत नाही**
**नकोस सोडू धीर असा तू**

**सापडेल उपाय काही न काही..**

**बेस्ट नाही तर करतो का तू कीर्तन**
**बन प्रवचन कार कर संकीर्तन**
**असा बनून जा तू झटकन**
**अप्पांना आवडेल ते वर्तन**

**पण छे! असा का क्रॅश कोर्स**
**असतो का कीर्तनकारीचा?**
**पण म्हटले एक आयडिया**
**क्लिक झाली तर वाटा खारीचा..**

**असे वाटते की गावे कुठले**
**उदास गीत की काही तराणे**
**पण हाय का असावे माझे**
**कीर्तनकारांचे ही घराणे?**

**राज :**

**व्हॉट टू डू नाही याचा**
**कुठे ही एंड इन साईट..**
**कुणी म्हणेल उठ रे राजा**
**लेट्स गिव्ह अ टफ फाइट..**

**उगाच बोलावे शब्द असे**
**पेप टा◌ॅक स्वत: स्वत:सच द्यावा**
**देता देता एक दिवस**
**घेणाऱ्याचा हातच घ्यावा..**

**त्याच हाताने स्वत:सच द्यावी**
**छानसी एक नोकरी**
**मग पांगारकरच काय**
**त्यांचा बाप पण देईल छोकरी..**

# ९ एंड इन साइट!

पाठीमागून काव्य निवेदन

ते सुरू असताना राज आपल्या अस्ताव्यस्त कवि अवतारात दोन तीन राजकीय पक्षांच्या ऑफिसात शिरतोय.. तिकडे त्याची मुलाखत सुरू आहे.. एका ठिकाणाहून निघताना तो आनंदाने फोनवर बोलतोय.. मध्येच व्ही फॉर व्हिक्टरीची खूण करतोय.. तिकडून दुसऱ्या ऑफिसात.. तिथेही तेच.. मग तिसरीकडे..

बाहेर पडता पडता तो सुहास्य वदनाने निघतोय..

**बघा हो हा इन्स्टंट कालिदास**
**नाही हा हताश नाही उदास**
**त्याला एका नोकरीची होती आस**
**त्याचे सारे डिटेल्स ठाऊक तुम्हास**
**जी जी जी..**

**त्यात मग ऐकावं काय जाहले**
**नवीन असे विराजने काय पाहिले**

**नोकरीसाठी उंबरठे किती झिजवले**
**प्रियेसाठी राज ने तसे केले**
**जी जी जी..**

**कालिदासाचा दोस्त विराज**
**दाखवे त्यास नवनोकरी बाज**
**कवितांची पुरी करशील खाज**
**म्हणे कविराज कराल तुम्ही राज**
**जी जी जी..**

**म्हणाल तुम्ही नोकरी ही अशी कशी**
**ज्यात कवितांची चाले मखलाशी**
**इतक्या काढल्या कविने उठाबशी**
**पण इकडे कालिदास न पडला फशी**
**जी जी जी..**

**हा जॉब जणू होता पहात वाट**
**त्याचा जणू अलगच आहे थाट**

अक्षर शब्दांचे वाहू दे पाट
असा हा नवनोकरीचा घाट
जी जी जी..

अहो सांगतो विराजने काय वाचले
जाहिरातीत होते काय म्हटले
अन ते कालिदासास कसे पटले
राज प्रिया धावत का सुटले
जी जी जी..

ऐका ही त्या गावची सुरस कथा
त्या गावी राजाची होती प्रथा
कल्याणकारी राज्याची गोष्ट सर्वथा
पसरवावी सर्वदूर राजाची गाथा
जी जी जी..

राजा तो असा धुरंधर अति
विरोधक राजाचे अल्पमति

**त्यांना ना कशात होती गती**
**तरीही राजास त्यांची भीती**
**जी जी जी..**

**राजास म्हणाले राजगुरू एकदा**
**राजा तू प्रचार कर सर्वदा**
**विरोधकांना ठेचण्यासाठी नको गदा**
**वापर तो प्रपोगंडा बदा बदा**
**जी जी जी..**

**राजन, तू असशी हुशार असा**
**म्हणावे इतरेजनांनो घरी बसा**
**सांगा सर्वकाळ फोडुनी घसा**
**जोडूनी शब्द न शब्द असा**
**जी जी जी..**

**करावा प्रचार व्हॉट्स्यापी फेसबुकी**
**उगा न क्रेडिट घालवावे फुकाफुकी**

**पसरवावी माहिती ओलीसुकी**
**विरोधकांस हाणावी शब्द बुक्की**
**जी जी जी..**

**न बाळगावी सत्यासत्याची तमा**
**पसरवावे आपल्या एकेक उपक्रमा**
**विरोधकांस न करावी क्षमा**
**प्रचारा तोंड देताना लागावा त्यांना दमा**
**जी जी जी..**

**शब्द हे अमोघ शस्त्र तू जाण**
**शब्द काम करती जणू जहरी बाण**
**विरोधकांचे उडवति ते शिरस्त्राण**
**जनसामान्य त्यांस मारती पायताण**
**जी जी जी..**

**दिवस अशा प्रचाराचे असती आता**
**शब्द हेच शस्त्र हवा नवा भाता**

फेकावे विरोधकांस पार समुद्रसाता
बसूदे त्यास दात ओठ खाता
जी जी जी..

राजन हवे तुज असे सैनिक शब्दांचे
घालतील दैनिक रतीब तव वर्णनाचे
बनवून लिखाण कवितेचे साचे
या कविच्या बोटावरी सरस्वती नाचे
जी जी जी..

विरोधकांस राज्यात लागला सुगावा
राजाचा कळला त्यांना कावा
म्हणाले, हा उपाय आम्हीही करून पहावा
म्हणूनी म्हणे लेखक कवी तो शोधावा
जी जी जी..

असे जे लिहिती काहीबाही सत्वरी
असो खरे वा खोटे काहीतरी

**जनांस पाडती संभ्रमात सत्वरी**
**असे हवे लेखक कवी या भूवरी**
**जी जी जी..**

**राजा नि त्याचे विरोधी दोघांनी**
**दिलेली जाहिरात पेपराच्या मधुनी**
**जे लिहिती पटपटा शब्द शब्द जोडूनी**
**सत्वर तत्काळ हवे कविगण म्हणूनी**
**जी जी जी..**

**म्हणती ते सोशल मिडियावरी**
**हवा तो कंटेंट आपापला भारी**
**सत्य वा काल्पनिक तर लयभारी**
**लोकांना चटपटीत द्यावे सत्वरी**
**जी जी जी..**

**कुणी म्हणे त्यास आयटी सेल**
**कुणी म्हणे अक्षरशब्दांची भेळ**

पण हवा शब्दांचा त्वरित मेळ
खेळायाला राजकारणाचा खेळ
जी जी जी..

म्हणूनचि शोधती सारे कुणी
अक्षर अन शब्दांचे कुणी धनी
कविता जयांच्या स्वप्नी ध्यानीमनी
करावे त्यांना एम्प्लाॅय देऊनी मनी
जी जी जी..

असा आमचा हीरो हा राज
एक नव्हे तीन ठिकाणी आज
लागला नोकरीस कविराज
बनवेल कविता चढवून शब्दांचा साज
जी जी जी..

नोकरी नव्या जमान्याची हाय
मिळवली हाय पठ्ठ्याने का नाय

नसती तर दे माय धरणी ठाय
खाल्ली असती बेट्याने हाय
जी जी जी..

निघाला तिकडून तडक कविराज
प्रियाच्या घरी दाखवण्या मिजास
म्हणे द्या प्रियेचा हात तिच्या बापसास
चालू आहे त्याचा पोलिस तपास
जी जी जी..

तुम्ही म्हणाल

ही काय शेवटची ओळ?
का घालतो हा शाहीर घोळ

पण ऐका जनहो ऐका..

वर्ड बँकेतून मिळाले शब्द..

**त्यांची बांधली पवाड्याची मोळ**
**जी जी जी..**

**पाठून एकेक राजकारणी येऊन उभे राहातात.. एकेक ओळ गात तोच पोवाडा पुढे नेतात..**

**ऐका ऐका सकल जन हो ऐका**
**दिले ना वचन तुम्हास न फुका..**
**सर्वांचा विकास असो बोलका की मुका**
**दिल्या ना नोकऱ्या तुम्हास नाही चुका**
**जी जी जी..**

# १० घोड्याची गंगेत अंघोळ!

एक लग्नाचा हॉल. सगळीकडे लगबग आहे. बाहेर बोर्ड:
शुभमंगल.. प्रिया आणि राज.. विवाह सोहळा
त्या पार्श्वभूमीवर

**राज:**

**शब्द शब्द**
**जोडून ठेवेन**
**कवितेच्या कडव्यांपरी..**

**मी कालिदास**
**मी कविराज**
**होईन सिंहासनावर विराज..**

**वर्ड बँकेचे**
**माझ्यावर ऋण**
**त्यापायी प्रियेची भुणभुण..**

**पण गेलो करून**
**कॉलर टाईट**
**म्हणालो, सासरे फ्युचर इज ब्राईट..**

**एका महिन्यात हवी**
**पांगारकरांची होती अट**
**आता वसूल करेन त्याच्या कितीतरी पट..**

**एक नाही दोन नाही**
**नोकऱ्या मिळाल्या तीन ठिकाणी**
**जमवीन शब्द शब्द आणि रचीन छान गाणी..**

**वाटलं नव्हतं शब्दांसाठी**
**मिळतील असे पैसे चार**
**भले शब्द बँकेतून घ्यावे लागोत उधार..**

**काय म्हणता?**

**नोकरी तीन ठिकाणी कशी?**
**अहो डिमांडच इतकी.. सांगू तरी कशी?**

**खरे काय आहेना..**
**शब्दांवरती ज्याची कमांड**
**त्याला मार्केटमध्ये फारच डिमांड**

**सगळीकडे म्हणे आहे**
**सोशल मिडियाचा बोलबाला**
**नसेलच शब्दजुळारी तर करतील कसा दहिकाला?**

**इन्स्टंट कालिदासाची**
**खरीखुरी आहे कहाणी**
**आता येऊ द्यात बिले नि उभा ठाको समोर वाणी!**

**आता प्रिया आणि राज दोघांचे लग्न लागतेय..**
**पांगारकर अक्षता टाकतायत.. विराज मंगलष्टकं म्हणतोय..**

**विराज:**

**आली अशी ही घटिका**
**भरली म्हणावी तिज कां?**
**अश्वारूढ वरात दारी**
**जागा द्या, बाजूस सरकां**
**पांगारकरसुता वरते**
**कविराजास बरं कां..**
**शुभ मंगल सावधान..**

**कविराज कालिदास**
**लिहिता इन्स्टंट शाकुंतलं**
**परंतु आता विवाहोत्तर**
**अडकेल प्रियेच्या कुंतलं..**
**होईल का त्याच्याने कविता**
**की काव्यनिर्मिती बंडलं..**
**शुभ मंगल सावधान..**

**होई याची कविता अशी**

**वृत्त छंदातील की टिंगलं**
**घेई लोनवर शब्द असा की**
**न एक ओळ सुटे सिंगलं**
**आता भरली घटिका पळे**
**कुर्यात सदा मंगलं..**
**शुभ मंगलं (खरोखरीच) सावधान..**

**वाजवा रे वाजवा होते.. वरमाला नि वधूमाला एक्स्चेंज होतात.. सोहळा पुढे सुरू राहतो**

पार्श्वभागी निवेदन:

**तर अशी ही लोकहो**

**डिमांड तसे काव्य**
**शब्द जशी मागणी**
**यास न कोणाचे वावडे**
**करतो हवी तशी लावणी..**

**बदलले दिवस समजा**
**शब्दांनी वाढते वट**
**वापरून सारा मिडिया**
**करु जाहिराती चिवट**

**घेऊन शब्दाक्षरांचा झाऱ्या**
**पाडत कवितांची बुंदी**
**कविराजांनी केली पहा**
**यशस्वी जीवनाची नांदी**

**हाती घेऊन शब्दांचा सोऱ्या**
**चकल्या पाडतो महा**
**डिमांड सगळीकडून यास**
**हा राज राज्य करतो पहा..**

**अशी ही..**
**कालिदासाची इन्स्टंट दास्तान**

**नव्हे**

**इन्स्टंट कालिदासाची दास्तान**

**ज्याने कवितेच्या जोरावर**

**बसवले इथे बस्तान!.**


डॉ. नितीन मोरे यांची ४२+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल





























डॉ. नितीन मोरे






डॉ. नितीन मोरे यांची ४२+२ प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.























डॉ. नितीन मोरे
राग दरबारी
नाच जमूरे नाच
आधुनिक कहाण्या
घरात
सांगतो ऐका
केल्याने



डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक : अंजना लगस (8208834250)
कानगोष्टी


डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते



अंजनईय
डॉ. नितीन मोरे
मी मेल्याबिया बोलते
अभिवाचक व तंत्रज्ञ : अंजना लगस



डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
रोमिओची परी कथा


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


जॅक्सन...
Jackson!


डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा २
देव, औरंगजेब, अज्ञानेश्वर इ...


सुलट
२५९
डॉ. नितीन मोरे

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे पंचेचाळीसावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभिरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९),

शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(१०), डॉ. नितीन मोरे (४५), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (१०), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (११), डॉ. वृषाली जोशी(४०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२६), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१०), श्याम कुलकर्णी(११), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (५), प्रवीण दवणे, आर्या जोशी, सरोज सहस्रबुद्धे (५)  असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक

नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "ई"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

9869674820 (for free books on whatsapp)